"नांदेड जिल्ह्यातील वीट बालकामगारांच्या समस्या : एक समाजशास्त्रीय अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखा अंतर्गत 'समाजशास्त्र' या विषयातील पीएच्.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करण्यात आलेला शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा

*** संशोधक ***

दिगांबर फकिरराव हरदडकर

सामाजिकशास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

*** मार्गदर्शक ***

प्रा.डॉ.दीपक सुधाकरराव धारवाडकर

समाजशास्त्र विभागप्रमुख,
तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सेनगाव, ता.सेनगाव, जि.हिंगोली.

*** संशोधन केंद्र ***

सामाजिकशास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड.

मार्च २०२२

"नांदेड जिल्ह्यातील वीट बालकामगारांच्या समस्या : एक समाजशास्त्रीय अभ्यास"

प्रस्तावना :-

प्रस्तुत संशोधनाचा विषय "नांदेड जिल्ह्यातील वीट बालकामगारांच्या समस्या : एक समाजशास्त्रीय अभ्यास" सदरील संशोधन शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करुन करण्यात येणार आहे. नैसर्गिक शास्त्रात वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करुन संशोधन केले जाते. त्याच अनुषंगाने सद्य:स्थितीत समाजशास्त्र विषयात वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करुन संशोधन केले जात आहे. अज्ञात ज्ञानाची माहिती करुन घेण्यासाठी संशोधनाची आवश्यकता अधिक प्रमाणात असते. समाजशास्त्र विषयाच्या अध्ययनाची तथा संशोधनाची स्वतंत्र वैज्ञानिक पद्धती प्रचलित आहे. 'कार्ल पियरसन' या शास्त्रज्ञाचे वैज्ञानिक पद्धतीच्या संदर्भातील विचार महत्त्वाचे ठरतात. त्यांच्या मते, "सत्याकरिता कोणताही लघुमार्ग नाही, विश्वातील ज्ञान प्राप्त करण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीच्या अवलंबनाशिवाय दुसरा मार्ग नाही."[१]

समाजशास्त्र विषयातील संशोधन ही प्रक्रिया ज्ञानकक्षा वाढविणारी आहे. "Research" या इंग्रजी शब्दाला मराठीमध्ये "संशोधन" असे म्हणतात. "To research" म्हणजे शोधून काढणे आणि "Re-search" म्हणजे पुन्हा पुन्हा शोधणे होय. म्हणजेच सामाजिक वास्तवतेचा किंवा सामाजिक सत्याचा पुन्हा पुन्हा शोध घेणे म्हणजे संशोधन होय. म्हणूनच ज्ञानासाठी शोध "Search for knowledge" हे संशोधनात प्रचलित आहे. 'वेबस्टरच्या शब्दकोशात' म्हटले आहे की, "संशोधन हा ज्ञानाचा अविभाज्य भाग आहे. संशोधन एक प्रवाह आहे तो कधीच थांबत नाही. वर्तमान ज्ञानात नवीन ज्ञानाची भर टाकणे हे संशोधनाचे मूलभूत कार्य आहे."[२] सामाजिक संशोधनाच्या संदर्भात 'गुड आणि हॅट' यांनी व्याख्या स्पष्ट केली आहे. त्यांच्या मते, "सामाजिक जीवन जगण्याच्या लोकांच्या जीवनाचे सखोल अध्ययन करुन त्यातील क्रियाशील अंतर्भूत प्रक्रियांना शोधून काढणे म्हणजे सामाजिक संशोधन होय." तसेच पी.व्ही.यंग या शास्त्रज्ञांची व्याख्या महत्त्वाची आहे. त्यांच्या मते, "सामाजिक संशोधन म्हणजे सामाजिक जीवनाबाबत नवीन तथ्ये शोधण्यासाठी अथवा जुन्या तथ्यांचे परीक्षण करण्यासाठी त्या तथ्यातील अनुक्रम, परस्परसंबंध व कार्यकारणभाव याविषयी स्पष्टीकरण आणि सामान्यीकरण प्रस्थापित करण्याची एक पद्धतशीर प्रक्रिया होय." या संदर्भाने 'सी.ए.मोझर' यांनी व्याख्या केली आहे. त्यांच्या मते, "सामाजिक घटना व समस्या याबाबत नवीन ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून केलेल्या क्रमबद्ध संशोधनाला सामाजिक संशोधन म्हणतात." [३]

बालकामगार संकल्पना :-

बालकामगार ही संकल्पना सार्वत्रिक स्वरुपाची आहे. जगातील सर्वच देशात बालकामगारांची समस्या ही अत्यंत गंभीर आहे. विकसित देशातही तुलनेने कमी प्रमाणात का असेना बालकामगारांची समस्या जाणवते. विकसनशील देशात तर बालकामगारांच्या समस्येने गंभीर स्वरुप धारण केले आहे. विकसनशील देशात लहान मुलांना कामावर ठेवणे ही सामान्य बाब बनली आहे. परंतु, ही बाब देशाच्या प्रगतीसाठी व विकासासाठी घातक ठरत आहे. जगातील इतर देशांपेक्षा भारतात बालकामगारांची संख्या सर्वाधिक आहे. सर्वाधिक बालकामगार असलेला देश अशी जागतिक पातळीवर भारत देशाची ओळख आहे. भारत हा कृषीप्रधान देश आहे. शेती व शेतीला पूरक व्यवसायात काम करणाऱ्या बालकामगारांची संख्या सर्वाधिक आहे. ग्रामीण भागात गरीब पालकांचा कल मुलांनी शेतीव्यवसाय करावा असा आहे. तसेच शेतीशिवाय इतर व्यवसायातही बालकामगार दिसून येतात. प्रामुख्याने दुकाने, मोटार गॅरेज, हॉटेल्स, बांधकाम, वीट कारखाना आणि ऊसतोड मजुरी इत्यादी व्यवसायात लहान मुले काम करीत असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे गालिचे तयार करणे, आगपेट्या तयार करणे, फटाके बनविणे, कुलूपे बनविणे, बांगड्या तयार करणे आदी कामे लहान मुलांकडून करवून घेतली जातात. याशिवाय बुटपॉलीश करणे, रद्दी गोळा करणे, भंगार गोळा करणे, वर्तमानपत्रे घरपोच टाकणे इत्यादी ठिकाणी मोठ्या प्रमाणात बालकामगार काम करीत असतात.[४]

बालकामगारांच्या प्रमुख व्याख्या :

१) युनिसेफ (UNICEF)

युनिसेफने बालकामगारांची व्याख्या भिन्न वयोगट आणि त्यांच्या कामाचे स्वरुप याआधारे नमूद केलेले आहे. युनिसेफच्या मते, "बालकामगार म्हणजे १५ ते ११ वयोगटातील स्त्री-पुरुष, बालकांने किमान १ तास आर्थिक क्रिया किमान १८ तास कौटुंबिक कामे करणे, १२ ते १४ वयोगटातील बालकाने किमान १४ तास आर्थिक क्रिया किमान ४२ तास आर्थिक क्रिया आणि आठवड्याला कौटुंबिक काम करणे होय."

२) आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO)

या संघटनेने नमूद केले की, बालके वा किशोरवयीन मुले करत असलेल्या कामामुळे त्यांच्या आरोग्यावर आणि व्यक्तिगत विकासावर विपरीत परिणाम होत नसेल किंवा त्यांच्या शालेय शिक्षणाला बाधा येत नसेल तर ती व्यक्ती बालकामगार आहे असे म्हणता येत नाही.

३) खान अधिनियम १९५२ या कायद्यातील कलम २(२) नुसार बालक म्हणजे वयाची १५ वर्षे पूर्ण नसलेली व्यक्ती.[५]

संशोधन विषयाची निवड :

पाश्चात्त्य देशात औद्योगिक क्रांती झाली. औद्योगिक क्रांतीमुळे युरोपिय देशात विविध कारखान्यांची निर्मिती झाली. परिणामी, भारतात देखील विविध ठिकाणी कारखान्यांची स्थापना करण्यात आली. कालांतराने भारतातील लघु आणि कुटिर उद्योग बंद पडले. त्यामुळे ग्रामीण समाजातील व्यक्तींना रोजगारासाठी शहराकडे स्थलांतर करावे लागले. शहरात मोठमोठ्या कंपन्यांची व इमारतींची संख्या झपाट्याने वाढत आहे. कंपनी व इमारतींच्या बांधकामासाठी वीटांची आवश्यकता असते. त्याकरिता शहराच्या जवळपास, नदीच्या किनारी, बंधाऱ्याच्या ठिकाणी वीट निर्मिती करणाऱ्या कारखान्यांची संख्या देखील झपाट्याने वाढत आहे. वीट बनवण्यासाठी अनेक कुटुंब येत आहेत. त्यांच्यासोबत लहान मुले देखील येत आहेत. लहान मुलांच्या वीट बनवितांना विविध उद्‌भवणाऱ्या समस्या यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे महत्त्वाचे वाटले म्हणून संशोधकाने सदरील विषयाची निवड केलेली आहे.

वीट बालकामगारांच्या समस्यांचा आढावा घेताना त्यांच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती, दारिद्र्य रेषेखाली जगत असलेले जीवन, कुटुंबातील सदस्यांचा व्यवसाय, शिक्षणाची समस्या, सामाजिक समस्या, आर्थिक समस्या, निवासस्थानाची समस्या, खानपानाची समस्या आदी प्रमुख समस्यांचा आढावा घेण्यात येणार आहे. सद्य:स्थितीत वीट बालकामगारांची संख्या वेगाने वाढत आहे. वीट बालकामगारांचे प्रश्न दिवसेंदिवस वाढत आहेत. वीट बालकामगारांना आर्थिक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. वीट बालकामगारांना मालकाकडून सन्मानपूर्वक वागणूक दिली जाते का? वीट बालकामगारांकडून त्यांचा मालक कुटुंबातील इतर कामे करवून घेतो काय? वीट बालकामगारांचे शिक्षण चालू आहे काय? वीट बालकामगारांना कामाचे तास निश्चित आहेत काय? वीट बालकामगारांना किती तास काम करावे लागते? वीट बालकामगारांना त्यांच्या कामाचा योग्य तो मोबदला दिल्या जातो काय? वीट बालकामगारांची निवासाची व्यवस्था केली आहे काय? वीट बालकामगार समस्यांकडे शासनाचे लक्ष आहे काय? वीट बालकामगार प्रथेचे बालकांवर आणि समाजावर विपरीत परिणाम होत आहेत काय? वीट बालकामगारांना मालक मारहाण करतो काय? वीट बालकामगार समस्यांची तीव्रता, जनसंपर्क माध्यमे प्रकाशित करतात काय? वीट बालकामगारांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वंयसेवी संस्थेची भूमिका कोणती आहे? इत्यादी वीट बालकामगार समस्यासंबंधीत प्रश्न व अडचणी प्रस्तुत समाजशास्त्रीय संशोधनात अभ्यासण्यात येणार आहेत.

संशोधनाचे उद्देश :-

वीट बालकामगारांच्या समस्यांचा अभ्यास करणे हे प्रमुख उद्दिष्टे राहिलेले आहे. प्रस्तुत अध्ययनाचे उद्देश स्पष्ट करणे आवश्यक ठरते. संशोधकाने वीट बालकामगार समस्येची वाढती तीव्रता कमी व्हावी या प्रमुख

उद्देशाने संशोधन करण्याचे ठरविले आहे. नांदेड जिल्ह्यात गोदावरी नदी, आसना नदी, मन्याड नदी, मांजरा नदी, लेंडी नदी, पैनगंगा नदी आणि विविध बंधाऱ्यांच्या किनारी मोठ्या प्रमाणात वीट कारखाने आहेत. प्रस्तुत कारखान्यांवर ग्रामीण भागातून कुटुंब वीट व्यवसाय करण्यासाठी येत असतात. त्यांच्यासोबत त्यांचे लहान मुलेपण येत असतात. लहान बालके कोवळ्या वयात शाळेत न जाता आई-वडिलांसोबत वीट बनवण्यासाठी येत असतात. प्रामुख्याने ही बालके ग्रामीण भागातून किंवा शहरातून झोपडपट्टी वस्तीमधून आलेले दिसून येतात. अत्यंत हलाखीच्या आर्थिक परिस्थितीत जीवन जगणारी बालके आपल्या कुटुंबाला काम करुन आर्थिक आधार देत असतात. बालकांच्या कुटुंबात अज्ञान व अंधश्रद्धा दिसून येते. वीट बालकामगार बालकांच्या कुटुंबाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी बाबींचा विचार केला तर त्यांना मागास किंवा दुय्यम स्थान दिले गेले आहे. वीट कारखान्यावर कारखानदार कमी दामात जास्तीत जास्त त्यांच्याकडून काम करुन घेतो तसेच वीट कारखान्यावरील काम कायम स्वरुपी नसते. ते काम फक्त आठ महिने असते. नंतर त्यांना कामासाठी इतर ठिकाणी जावे लागते. या सर्व बाबीचा विचार करुन पुढील उद्देशांच्या पूर्ततेसाठी प्रस्तुत संशोधन कार्य संशोधकाने हाती घेले आहे.

१. समकालीन समाजव्यवस्थेतील वीट बालकामगारांच्या समस्यांचे स्वरुप जाणून घेणे.

२. वीट बालकामगार निर्मितीची कारणे आणि परिणामांचा अभ्यास करणे.

३. वीट बालकामगार निर्मुलनाच्या संदर्भात करण्यात आलेल्या उपायांचा अभ्यास करणे.

४. वीट बालकामगारांच्या कल्याणाच्या दृष्टिने करण्यात आलेल्या विविध कायद्यांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितकृत्ये :-

प्रस्तुत संशोधनात गृहितकांची मांडणी करणे महत्त्वाचे आहे. म्हणजेच संशोधनामध्ये गृहितकृत्ये महत्त्वाची भूमिका बजावित असतात. कारण वैज्ञानिक संशोधन हे तार्कीक व वस्तुनिष्ठ असते. वैज्ञानिक अभ्यास पद्धतीतील एक अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजेच गृहितकृत्ये होय. गृहितकांमुळे संशोधन कार्याला गती प्राप्त होते. कारण गृहितकृत्याअभावी संशोधकाची स्थिती ही दिशाहीन असते. गृहितकृत्ये हे संशोधकाला मार्गदर्शन करण्याचे कार्य करतात. वैज्ञानिक पद्धतीच्या आधारे संशोधन करताना संशोधकाला त्या विषयाचे थोडे पूर्वज्ञान व त्या विषयासंबंधी अनुभव असणे आवश्यक असते. कारण ज्या ज्ञानाच्या आधारे अभ्यासक हा आपल्या संशोधन विषयासंबंधी कोणते तरी सामान्य अनुमान निश्चित करीत असतो. या संदर्भात 'कोहेन व नॅगेल' यांनी गृहितकृत्यांची व्याख्या केली आहे. त्यांच्यामते, "चौकशी वा संशोधनास चालना देणाऱ्या प्रारंभिक अडचणीचे वा

समस्येचे संभाव्य निराकरण व उत्तर सुचविल्याशिवाय आपण संशोधन कार्यात पहिले पाऊलसुद्धा पुढे उचलू शकत नाही. समस्येची अशी संभाव्य उत्तरे आपणास अध्ययन विषयाच्या कोणत्यातरी पैलुमुळे विषयाबाबतच्या पूर्व ज्ञानामुळे सूचतात. अशा उत्तरांचे जेव्हा विधानामध्ये रूपांतर केले जाते, तेव्हा ते उत्तरे गृहितकृत्य बनतात."(६) गृहितकांची निर्मिती सिध्द करणे यासाठी संशोधन केले जात नाही. तर सत्य शोधून काढणे हे संशोधनाचे अंतिम उद्दिष्ट असते.

"नांदेड जिल्ह्यातील वीट बालकामगारांच्या समस्यांचा अभ्यास : एक समाजशास्त्रीय अभ्यास" प्रस्तुत विषयाच्या अध्ययनाकरिता पुढील प्रमाणे गृहितकृत्ये मांडलेली आहेत.

१. कुटुंबाची दुय्यम आर्थिक परिस्थिती, दारिद्र्य आणि व्यसनाधिनता यामुळे वीट बालकामगार निर्माण होतात.

२. वीट बालकामगारांचे कुटुंब हे शिक्षणापासून वंचित असल्यामुळे बालकांना कोवळ्या वयात विविध कामे करावी लागत आहेत.

३. वीट बालकामगार समस्येच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कायद्यांचा वीट बालकामगार निर्मुलनासाठी म्हणावा तेवढा उपयोग होत नाही.

४. वीट बालकामगारांच्या कल्याणाच्या दृष्टिने शासकीय व निमशासकीय कार्य कमी आहे.

संशोधनाचे अध्ययन क्षेत्र :-

सदरील विषयाचे अध्ययन करण्यासाठी अध्ययन क्षेत्राची निवड करणे अनिवार्य असते. कारण संशोधनाचा विषय एका विस्तीर्ण क्षेत्रातील असतो; परंतु त्या सर्व क्षेत्रातून माहिती संकलित करणे अशक्य असते. अशावेळी संशोधकाला आपले अध्ययनाचे क्षेत्र देखील निश्चित करावे लागते. संशोधन कार्यक्षेत्राची निवड योग्य पद्धतीने केले तरच ते कार्य पुढे जाऊ शकते. अन्यथा अनेक अडचणी उत्पन्न होतात. कार्यक्षेत्राचे भौगोलिक स्थान कोणते, तेथील जनसमुदाय कसा आहे या गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. म्हणून कार्यक्षेत्राच्या निवडीस विशेष महत्त्वाचे स्थान असते. संशोधनकर्त्याने अध्ययन क्षेत्राची निवड करण्यासाठी "नांदेड" जिल्ह्याची निवड केली आहे. नांदेड जिल्ह्यात प्रमुख सोळा तालुके असून विविध नद्यांच्या खोऱ्यातील हा प्रदेश आहे. त्यात प्रामुख्याने गोदावरी, पैनगंगा, मन्याड, मांजरा, लेंडी, आसना आदी नद्यांचा समावेश आहे. सदरील नद्यांच्या किनारी व त्यावरील बांधलेल्या बंधाऱ्याच्या ठिकाणी वीट तयार करण्याचे कारखाने आहेत. त्या कारखान्यांवरील वीट बालकामगारांचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत अध्ययन क्षेत्राची निवड केली आहे.

संशोधन आराखडा :-

संशोधनातील एक महत्त्वाची पायरी संशोधन आराखडा आहे. संशोधन आराखड्याशिवाय वस्तुनिष्ठ संशोधन करणे अशक्य असते. शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करुन संशोधन करीत असताना संशोधकाला मार्गदर्शन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संशोधन आराखडा करते. प्रस्तुत संशोधनाच्या उद्देशाची प्राप्ती करण्यासाठी योजनाबद्ध रुपात संशोधन कार्य करणे आवश्यक आहे. याचा अर्थ संशोधन कशा पद्धतीने केले जाईल या अनुषंगाने पूर्वनियोजन करावे लागते. संशोधन आराखडा हेतूपूर्वक तयार केलेली पूर्वनियोजित प्रक्रिया असते. संशोधनास सुरुवात करण्यापूर्वीच संशोधकाला संशोधन आराखडा तयार करावा लागतो. त्यामध्ये संशोधनाचा विषय, संशोधनाचे उद्देश, संशोधनाचे क्षेत्र, संशोधन कालावधी, तथ्य संकलनाची साधने, नमूना निवडीचे आधार, तथ्यांचे विश्लेषण या सर्व बाबींचा विचार संशोधन आराखड्यात केला जातो. 'एकॉफ' यांच्या मते, "संशोधन प्रक्रियेत निर्णय कार्यान्वित करण्याची स्थिती येण्यापूर्वीच निर्णय निश्चित किंवा निर्णय निर्धारित करण्याच्या प्रक्रियेला संशोधन आराखडा असे म्हणतात."[७]

संशोधनात अवलंब करावयाचे विविध आराखडे आहेत; परंतु सदरील संशोधनाचे उद्देश लक्षात घेऊन एका आराखड्याची निवड करावी लागते. "वीट बालकामगारांच्या समस्या" प्रस्तुत विषयाच्या अध्ययनाकरिता 'निदानात्मक संशोधन आराखड्या'ची निवड करण्यात आली आहे. वीट बालकामगारांच्या समस्या ह्या अत्यंत गंभीर असून त्या मानव निर्मित आहेत म्हणजेच ती एक सामाजिक समस्या ठरली आहे. सदरील आराखड्यात वीट बालकामगारांच्या समस्यांचे विविध कारणे जाणून घेतली जातात आणि त्या समस्या कशा कमी करता येतील. या दृष्टीने काही प्रमुख उपाययोजना संशोधकाने करावयच्या आहेत. [८]

नमूना निवड :-

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनासाठी नमूना निवड पद्धतीचा अवलंब केला आहे. अचूक नमूना निवडीशिवाय संशोधन कार्य पूर्णत्त्वास जाऊ शकत नाही. योग्य व्यक्तीकडून विषयाच्या संदर्भात माहिती मिळविण्याचा प्रयत्न केल्यास वेळ व पैशांचा अपव्यय होत नाही. प्रस्तुत विषयाच्या संपूर्ण एककाऐवजी त्यांच्यातील प्रातिनिधिक नमूना निवडून व तथ्य संकलित करण्यासाठी नमूना निवड पद्धती उपयुक्त आहे. सदरील पद्धतीत संपूर्ण समग्रातून अभ्यास केला जात नाही. तर समग्रातून निवडलेल्या काही एककांचा सखोल अभ्यास करुन निष्कर्ष काढले जातात. 'फ्रॅंक मर्टन' यांच्यामते, "नमूना शब्दाचा उपयोग एखाद्या एककाच्या किंवा संपूर्ण समूहाच्या एका भागाला लागू पडतो. हा एक भाग समग्राचा प्रतिनिधी म्हणून निवडला जातो आणि तसे मानले जाते."[९]

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनासाठी गैरसंभाव्यता नमूना निवडीतील "सहेतूक किंवा उद्देशपूर्ण नमूना निवड" प्रकाराचा उपयोग करण्यात आला आहे. यामध्ये संशोधनकर्ता आपल्या अध्ययनाच्या उद्देशांना समोर ठेवून जाणीवपूर्वक समग्रातील काही एककांची निवड करतो. तेव्हा त्यास उद्देशपूर्ण नमूना असे म्हणतात. नांदेड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून वाहणाऱ्या नद्यांच्या किनारी व बंधाऱ्याच्या ठिकाणी असणाऱ्या वीट कारखान्यावरील २०० बालकांची नमूना म्हणून निवड केली आहे. वीट बालकामगारांच्या मुलाखती व अनुसूचीचा अवलंब करुन तथ्य संकलित करण्यात येणार आहेत.

तथ्य संकलन पद्धती :-

प्रस्तुत संशोधन विषयाच्या संदर्भात वस्तुनिष्ठ तथ्य संकलन करावे लागते. संशोधनात तथ्य संकलनास विशेष महत्त्व असल्याचे स्पष्ट होते. एवढेच नाही तर केलेल्या संशोधनाची सामाजिक आणि शासकीय धोरण ठरविण्याच्या दृष्टिने नेमकी उपयुक्तता किती आहे हे सुद्धा विचारात घ्यावे लागते. त्याकरिता विषयाच्या संबंधित तथ्यांचे संकलन करणे अतिशय महत्त्वाचे आहे. कारण त्याशिवाय वैज्ञानिक संशोधन करणे शक्य नसते. तथ्यांचे संकलन केल्यानंतर त्यांचे योग्य आणि व्यवस्थित वर्गीकरण आणि अध्ययन विषयाच्या संबंधित संकल्पनांची निर्मिती करणे आवश्यक आहे. योग्य संकल्पनांच्या आधारावर सिद्धांताचे प्रतिपादन करता येते. कोणत्याही घटनेच्या संदर्भात वास्तविक तथ्य संकलित करुन त्या तथ्यांच्या आधारावर नवीन सिद्धांताचे प्रतिपादन करता येते. संशोधनाचे यशापयश हे तथ्य संकलन साधनाच्या विश्वसनियतेवर अवलंबून असते. तथ्यांची व्याख्या 'पॉलिन यंग' या शास्त्रज्ञांनी केलेली आहे. त्यांच्यामते, "केवळ मूर्त वस्तू वा घटनांनाच तथ्य म्हणता येणार नाही. तर विचार, अनुभव देखील तथ्य आहेत." 'फेअर चाईल्ड' यांच्या मते, "तथ्य ही एक अशी घटना आहे की, जिच्या निरीक्षण आणि मापनाच्या विषयाबाबत सर्वांमध्ये अधिक प्रमाणात सहमती आढळून येते."[१०] संपूर्ण संशोधन तथ्य संकलनावर आधारित आहे. प्रस्तुत संशोधन विषयाच्या संदर्भात विविध पद्धती व साधनांचा वापर करुन उपयोगी व वस्तुनिष्ठ तथ्य संकलित करण्यात येणार आहेत. मी संशोधनासाठी तथ्य संकलनाच्या दोन स्त्रोतांचा अवलंब केला आहे.

अ) प्राथमिक स्त्रोत :-

प्राथमिक 'तथ्य' हा तथ्य संकलनाच्या पद्धतीमधील प्रथम प्रकार आहे. संशोधनकर्त्याने अध्ययन विषयाच्या संदर्भात स्वत: आवश्यक ती माहिती संकलित केली तिला प्राथमिक सामग्री असे म्हणतात.[११] प्राथमिक तथ्य ही संशोधनकर्त्याने एकत्रित केली असल्यामुळे ती अधिक वस्तुनिष्ठ असतात. संशोधक अध्ययन क्षेत्रात जाऊन वीट कारखान्यावरील नमूना म्हणून निवड केलेल्या वीट बालकामगारांच्या मुलाखती घेऊन व अनुसूचीचा अवलंब करुन माहिती संकलित करणार आहे.

ब)　　**दुय्यम स्रोत :-**

दुय्यम तथ्य संकलनांचे संशोधनात विशेष महत्त्व आहे. प्रकाशित आणि अप्रकाशित अशा संपूर्ण लिखित माहितीचा समावेश दुय्यम तथ्य संकलनात केला जातो. 'लुंडबर्ग' यांच्या मते, "द्वितीय कागदपत्रांचा उपयोग संशोधनातील अचूकता स्पष्ट करणे तसेच संशोधनाची दिशा निश्चित करण्यासाठी होतो. तसेच प्राथमिक तथ्यांना वस्तुनिष्ठतेचा पुरावा देण्यासाठी दुय्यम तथ्य महत्त्वाची भूमिका बजावित असतात. प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे, अभिलेख, हस्तलिखित पत्रे, दैनंदिनी, ग्रंथालय, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, संदर्भग्रंथ, अप्रकाशित एम.फिल. व पीएच्.डी.चे प्रबंध आणि इंटरनेट इत्यादी साधनांचा अवलंब करून तथ्य संकलित केली जाणार आहेत."[१२]

संकलित तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन :-

वीट बालकामगारांच्या समस्यांच्या अनुषंगाने वैज्ञानिक पद्धतीने तथ्यसंकलन करण्यात येणार आहे. नांदेड जिल्ह्यातील वीट बालकामगार यांच्याकडून मुलाखत व अनुसूचीद्वारे माहिती संकलित करण्यात येणार आहे. त्यानंतर तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन करण्यात येईल. संकलित तथ्यांचे संपादन, संकेतीकरण आणि वर्गीकरण तसेच सारणीकरण करण्यात येणार आहे. संकलित केलेल्या तथ्यांवर प्रक्रिया करण्याचे प्रमुख टप्पे आहेत, ते अध्ययनाअंती पूर्ण केल्या जातील.

निष्कर्ष आणि सूचना :-

वीट बालकामगारांच्या समस्या या विषयाचे अध्ययन वस्तुनिष्ठ करण्यात येईल. प्राथमिक साधनांच्याद्वारे संकलित केलेल्या माहितीचे सारणीकरण देखील करण्यात येणार आहे. सारणीचे स्पष्टीकरण केल्यानंतर अचूक निष्कर्ष मांडण्यात येतील. या निष्कर्षाचा अभ्यास करून शेवटी आवश्यक त्या सूचना किंवा शिफारशी सूचवण्यात येणार आहेत.

प्रकरणाची रुपरेषा :-

प्रकरण पहिले :- प्रस्तावना

प्रकरण दुसरे : संदर्भ साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : संशोधन आराखडा

प्रकरण चौथे : तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण पाचवे : संशोधन निष्कर्ष व शिफारशी

सारांश :-

थोडक्यात, वरील बाबींचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, बालकामगार ही सामाजिक समस्या आहे. बालकामगार समस्या शहराच्या विकासात अडथळा ठरत आहे. शासनाने बालकामगार समस्येच्या मुळापर्यंत जाण्याचा कधी प्रयत्न केलेला दिसून येत नाही. बालकांना कामावर ठेवण्यास प्रतिबंध करणारा कायदा संमत केला की, त्यासंबंधीचे आपले कर्तव्य संपले अशीच भूमिका शासनाने घेतली असल्याचे दिसून येते. प्रस्तुत कायदे मोडणाऱ्या घटकांवर योग्य ती कार्यवाही करण्याची क्षमता शासनाने दाखविलेली नाही. म्हणजेच कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करण्याची गरज दिसून आली नाही. त्याचप्रमाणे लहान मुलांना शरीरिक श्रमाची कामे का करावी लागतात याचा गांभीर्याने विचार करण्याकडेही लक्ष दिले नाही. बालमजुरीच्या समस्येचे मूळ दारिद्र्यात आहे या समस्येवर मात करण्यासाठी शासनाने दारिद्र्याच्या प्रश्नाला थेट भिडण्याची तयारी व राजकीय इच्छाशक्ती दाखविली पाहिजे. समाजातील सर्व घटकांना जीवनावश्यक गरजांची चांगल्याप्रमारे पूर्तता करून दिली पाहिजे. अशी सामाजिक व आर्थिक परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न शासनाने केला पाहिजे.

संदर्भग्रंथसूची :-

१. कऱ्हाडे बी.एम., (जून २००९), "सामाजिक संशोधन पद्धती", पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, पृ.क्र. २.

२. बोधनकर सुधीर, अलोणी विवेक, (२०१३), "सामाजिक संशोधन पद्धती", साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ.क्र.१३, १४.

३. पाटील वा.भा., (१९९८), "संशोधन पद्धती", मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ.क्र. ३.

४. मायी सुनिल, (१९९८), "भारतीय सामाजिक समस्या", अंशुल पब्लिकेशन, नागपूर, पृ.क्र. २११-२१३.

५. जाधव तुकाराम, शिरापूरकर महेश, (२०१८), "मानवी हक्क", युनिक अकॅडमी पब्लिकेशन्स प्रा.लि., पुणे, पुन:र्मुद्रण, पृ.क्र.५२.

६. आगलावे प्रदीप, (जानेवारी २०००), "संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे", विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.क्र. १२१, १२२.

७. करे बिभीषण, (जुलै २०१५), "सामाजिक संशोधनाची मूलतत्त्वे", विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, पृ.क्र. १००.

८. कित्ता, पृ.क्र. १०८.

९. बोधनकर सुधीर, अलोणी विवेक, कुलकर्णी मृणाल, (२०१८), "सामाजिक संशोधन पद्धती", साईनाथ प्रकाशन, नागपूर, आठवी आवृत्ती, पृ.क्र. १०५

१०. कऱ्हाडे बी.एम., (जून २००९), "सामाजिक संशोान पद्धती", पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, पृ.क्र. २११, २१२

११. आगलावे प्रदीप, (२०१६), "सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे", साईनाथ प्रकाशन, नागपूर, सहावी आवृत्ती, पृ.क्र. २११.

१२. करे बिभीषण, (जुलै २०१५), "सामाजिक संशोधनाची मूलतत्त्वे", विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, पृ.क्र. १४९.

१३. धारवाडकर दीपक, भालेराव साहेबराव (२०१७), "भारतीय समाज समकालीन समस्या", रूद्राणी पब्लिकेशन हाऊस, भोकर

१४. धारवाडकर दीपक, परदेशी महेशकुमार, (२०१६), "आधुनिक भारत में सामाजिक समस्याऐं", इशिका पब्लिशिंग हाऊस, दिल्ली.

१५. धारवाडकर दीपक, भालेराव साहेबराव (२०१४), "सामाजिक नियंत्रण एवं परिवर्तन", श्रीराम प्रकाशन, कानूपर

१६. शेख आर.के., (२०१८), "बालकामगार समस्या एवं समाधान", प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथम संस्करण.

१७. जैन निशा, सेन हरिशंकर (२००९), "असंघटित क्षेत्र में बाल श्रमिक", रावत पब्लिकेशन, रायपूर, प्रथम संस्करण.

१८. कुमार विरेंद्र, देवांगन (२०१९), "बाल श्रमिक", नेशन प्रेस, चेन्नई, प्रथम संस्करण.

१९. शिवहरे रोली, दुबे प्रशांत, (२०१०), "बालश्रम", विकास संवाद प्रकाशन, भोपाळ, प्रथम संस्करण.

२०. शर्मा जी.एल. (२००२), "सामाजिक मुद्दे", रावत पब्लिकेशन, जयपूर, प्रथम संस्करण.

२१. अहुजा राम (२०००), "सामाजिक समस्याएँ", रावत पब्लिकेशन, जयपूर, प्रथम संस्करण.

22. Misra R.N. (2004), “Problems of Child Labour in India”, Commonwealth Publishers, New Delhi.

21. Reddy D.Chenna (1998), “Child Labour : A Study”, Serials Publication, New Delhi.

22. Shukla Narendra (January 2012), “Child Labour in India : Nature and Issues”, Research Publication, Delhi.

23. Jaiswal Prachi, (2000), “Child Labour – A Sociological Study”, Shipra Publication, New Delhi.

24. Doshi S.L. and Jain P.G. (2007), “Rural Socialogy”, Rawat Publication, Jaipur.

25. Rajadhyaksha Ranjit (2004), “Encyclopaedia of Social Problems and Social Change”, Dominant Publishers & Distributors, New Delhi.

27. www.vikipedia.com

28. www.vikaspedia.com

29. https://vishwakosh.marathi.gov.in/32762/

30. https://kartavyasadhana.in/view-article/lockdown-and-unorganised-sector-writers-vivek-ghotale-and-sominath-gholwe-part2.

संशोधक
दिगांबर फकिरराव हरदडकर
सामाजिकशास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक
प्रा.डॉ.दीपक सुधाकरराव धारवाडकर
समाजशास्त्र विभागप्रमुख,
तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,सेनगाव,
ता.सेनगाव, जि.हिंगोली.